# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री

**संशोधक**
**प्रतिभा विश्वनाथ दुबे**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, कला, वाणिज्य व विज्ञान , ब्रम्हपुरी
E – Mail : pratibhadubey11@gmail.com
Mob.No. 9765701452

**मार्गदर्शक**
**डॉ. आर.एम. झाडे**
प्रोफेसर
के. डी. डी. महाविद्यालय, चामोर्शी
जिल्हा - गडचिरोली

---

**सारांश** ***(Abstract) :***

*आधुनिक भारतीय महिलांना सक्षम, स्वातंत्र्य आणि स्वावलंबी करण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी विविध अंगानी कार्य केले. यामध्ये समतावादी चळवळीचे भारतीय समाजसुधारक महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेष असे योगदान असल्याचे दिसून येते. म. फुले यांनी सुरु केलेल्या स्त्रीमुक्ती चळवळींला संविधानात्मक रुप देऊन पूर्णत्वास घेऊन जाण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. स्वातंत्र्यापूर्वी भारतीय स्त्रीयांवर धर्म, संस्कृती व पावित्र्याची जोड देऊन अनेक बंधने लादण्यात आली होती व स्त्री दास्याचे उदात्तीकरण केले गेले होते. अशा धर्म, जात, वंश, लिंगभेद व पितृसत्तेच्या कचाटयात अडकलेल्या भारतीय महिलांना बाहेर काढण्याचे कार्य आंबेडकरांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतामूलक दृष्टीकोणातून स्त्रीयांमध्ये परीवर्तन घडवण्यावर भर दिला. भारतीय हिंदू पुरुषप्रधान सांस्कृतीतील स्त्री आणि अस्पृश्य समाजातील शुद्रातिशुद्र समजली जाणारी स्त्री या सर्वांच्या उद्धारासाठी त्यांनी कार्य केले. समता व मानवतावादी समाजरचनेच्या निर्मिती करण्यासाठी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "स्त्रीयांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मी मोहिज असतो" यावरुन त्यांचा स्त्रीवादी दृष्टीकोन समजतो.*

---

**प्रस्तावना :**

असे म्हणतात कि प्रत्येक यशश्वी पुरुषाच्या पाठीमागे एका स्त्रीचा हात असतो , परंतु स्वतंत्र भारताच्या संपूर्ण स्त्रियांच्या प्रगती मागे फक्त एकच महापुरुषाचा हात आहे , आणि ते म्हणजे बोधिसत्व डॉ . बाबासाहेब आंबेडकर.......

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय समाजातील विविध घटकाच्या पुनरुत्थानात सामाजिक राजकीय धार्मिक आर्थिक शैक्षणिक साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अनमोल असे योगदान लाभले आहे. मनुष्य निर्मितीपासून भारतीय समाजातील विविध घटकांवर अन्याय करणारी जुनाट आचार विचारांची हजारो वर्षाची परंपरेवर आधारलेली व विषमतेच्या तत्त्वावर आधारित समाज व्यवस्था नष्ट करून त्याऐवजी समाजातील सर्व घटकात समता स्वातंत्र्य बंधुता व न्याय या लोकाधिष्ठित मानवी मूल्याची प्रतिष्ठापना ठरत नवसमाज निर्माण करण्याची महान कार्य डॉ. आंबेडकरांनी या देशासाठी केले. या नव समाजातील स्त्री आज 21 व्या शतकात

बिनधास्तपणे व स्वतंत्रपणे जीवन जगत आहे. प्राचीन कालखंडानंतर आधुनिक काळात मात्र तिची स्थिती भारतीय संस्कृती आणि समाजामध्ये एका आपले प्रमाणे होती. या स्त्री जीवनात अमुलाग्र परिवर्तन परिवर्तन होण्यास अनेक महापुरुषाचे योगदान कारणीभूत आहे. त्यापैकी महत्त्वाचे म्हणजे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत मा. ज्योतिबा फुले आणि त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांचे श्री विषयक कार्य होय. यानंतर डॉ. बाबासाहेबांनी आपल्या कृती आणि कार्य स्त्रीला मान सन्मान मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण योगदान भारतीय स्त्रियांसाठी दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांसाठी सामाजिक धार्मिक आर्थिक आणि शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात महत्त्वाचे कार्य केले त्यांनी केलेल्या बोलक्या सुधारकास प्रमाणे कार्य न करता कृतिशील कार्य केले. भारतीय समाजातील पुरुषप्रधान संस्कृती केवळ भाषणांनी आणि लेखनाने बदलणार नाही याचा त्यांना विश्वास होता. म्हणूनच त्यांनी स्त्रियांना सक्षम करण्यासाठी कायद्याची तरतूद केली त्यांनी केलेल्या श्री विश्वकर यांचा व त्यांच्या विचारांचा निवडक बाबींचा अभ्यास आपण या संशोधन पत्रिकेतून करणार आहोत.

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयक विचार :**

शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो समाजात परिवर्तन घडवून आणण्याचे असल्यास शिक्षण याशिवाय पर्याय नाही म्हणून डॉ. बाबासाहेबांनी स्त्रियांचा उद्धार करण्याचा असेल तर शिक्षणाशिवाय होऊ शकणार नाही अशी भूमिका मांडून स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला मनूने स्त्रियांचे अधिकार हिरावून घेतले स्त्रियांना नाकारणारी व्यवस्था मनुच्या काळात झाली ही मनूची जुलमी व्यवस्था नाकारणे स्त्रियांना सन्मानाने जगता यावे अशी व्यवस्था आपल्या विचारांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रस्थापित केली. डॉ. बाबासाहेबांनी विद्यार्थी दशेत असल्यापासून मुलांप्रमाणे मुली देखील शिक्षण घेतले पाहिजे असे त्यांना वाटत होते व सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी वावरले पाहिजे असे त्यांचे विचार होते सुयांनी शिक्षण तर द्यावे मात्र ते देखील सहशिक्षण घ्यावे हा मतांचे ते होते. श्री पुरुषांना एकच व एकत्र शिक्षण द्यावे यां गोपाळ गणेश आगरकर यांच्या मताशी ते सहमत होते म्हणूनच यांसाठी वेगळ्या शाळा महाविद्यालय असावी याच त्यांची सहमती नव्हती. कारण त्यांना स्त्री-पुरुषाच्या एकत्र शिक्षणाबरोबरच स्त्री पुरुष समानता हे तत्व देखील समाजात रुजवायचे होते.

**हिंदू कोड बिल व स्त्रीमुक्ती :**

प्राचीन बुद्ध काळातील भारतीय स्त्रीचे सामाजिक व्यवस्थेतील जे सर्वोच्च स्थान होते ते कडाानुसार लुप्त झाले. त्याला सर्वप्रथम धक्के देण्याचे कार्य महात्मा फुलेंनी केले त्यांनी स्त्रियांसाठी सर्वप्रथम श्री शिक्षणाचे दरवाजे उघडून दिले. पुढे त्यांच्याच कार्याने प्रेरित होऊन भारतीय स्त्रीला धर्म धर्माच्या पारंपारिक साल्ट्री तसेच पुरुषांच्या चोखड्यातून मुक्त करण्याचे कार्य बाबासाहेबांनी हिंदू कोड दिलाच्या रूपाने केले यातून भारतीय स्त्री खऱ्या अर्थाने गुलामगिरीच्या वेढ्यातून मुक्त झाले. डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल सादर केल्यानंतर त्याला प्रतिगामी विचारण्याच्या लोकांनी जोरदार विरोध केला. अर्थातच त्यावर डॉ. बाबासाहेबांच्या पुरोगामी विचारांची छाप होती या बिलासाठी त्यांना आपला मंत्रिमंडळाचा राजीनामा द्यावा लागला. मात्र त्यापुढील काळात हिंदू कोड बिल विविध लहान विलास स्वतंत्रपणे मंजूर झाले व ते बाबासाहेब यांच्या यश होते विविध स्वतंत्र मंजूर झालेल्या

बिलातून स्त्रियांना पुढीलप्रमाणे हक्क व अधिकार प्रथमच प्राप्त झाले.

1) स्त्रीला स्वतःहून घटस्फोट देण्याचा अधिकार.
2) नवऱ्याने घटस्फोट दिल्यास तिला घटस्फोट शिवाय पतीपासून विभक्त राहिल्या स्त्रीला पुढील जीवन व्यतीत करण्यासाठी पोटगी मिळण्याचा अधिकार.
3) मुलीला वडिलांच्या मिळकतीवर कुठला इतका समान हिस्सा मिळवण्याचा अधिकार तसेच मुलीला वडिलांच्या मिळकतीवर वारस होण्याचा अधिकार.
4) स्त्रियांना स्वतः कमावलेल्या मिळकतीवर अधिकार.
5) स्त्रियांना मुलं दत्त घेण्याचा अधिकार तसेच मुलाप्रमाणे मुलीला देखील दत्तक जाण्याचा अधिकार.
6) पतीला एक पत्नी असताना दुसरा विवाह करण्यास बंदी जेणेकरून स्त्रियांच्या होणाऱ्या अपेक्षा थांबतील.
7) आंतरजातीय विवाह करण्यास मान्यता.
8) स्त्रीला स्वतःचा वारस निर्वाचित करण्याचा अधिकार.

अशा रीतीने भारतीय संविधान व हिंदू कोड बिल्लाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील स्त्रियांना दिलेली अनमोल देणगी आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थ प्रयत्नामुळे भारतीय स्त्री आज मुक्तीचा व सुटकेचा श्वास घेत आहे स्त्रियांच्या अंधाकर्मे जीवनासाठी डॉ. बाबासाहेब हे खऱ्या अर्थाने दैदिप्यमान सूर्य ठरले

**निष्कर्ष :**

1. स्त्री शिक्षणातून भारतीय स्त्रियांनी तसेच अस्पृश्य समाजाबरोबरच इतर समाजाची व पर्यायाने देशाची उन्नती होईल हे बाबासाहेबांच्या विचारातून स्पष्ट झाले.
2. डॉ. बाबासाहेबांनी समाजातील सर्वसामान्य स्त्रियांबरोबरच समाजाने नाकारलेले स्त्रियांना मानसन्मान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.
3. डॉ. बाबासाहेबांनी भारतीय समाजातील स्त्रीच्या आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याच्या कार्यात मोलाचे योगदान दिले.
4. भारतीय समाजातील स्त्रियांना डॉक्टर बाबासाहेबांनी संविधानातून कायद्याद्वारे महत्त्वाचे अधिकार प्राप्त करून दिले.

भारताच्या पहिल्या कायदेमंत्र्यांनी , डॉ . बाबासाहेबांची मात्र तत्त्वनिष्ट पणे मंत्रिपदाचा जाहीरनामा दिला. आज ही ही मनोवृत्ती बदलेली आपणास दिसत नाही. याशिवाय सामान कामासाठी, सामान पगार असलाच पाहिजे (स्त्रीने - पुरुषांना ), महिला स्वरक्षण कायदा ,डिलिव्हरी सुट्ट्या पालकत्वाचा अधिकार , मालमतेचा अधिकार मिळवूण देणारे आंबेडकर "The one and only one " आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

1. पवार उर्मिला, मून मीनाक्षी ,'आम्हीही इतिहास घडवला ' सुगावा प्रकाशन पुणे २०००.
2. म. श्री. दीक्षित, ' आंबेडकरांचे विचारधन ' रघुवंशी प्रकाशन, दादर, मुंबई प्रथमावृत्ती १९८६.

3. वसंत मून , हरी नरके ( संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड - १८ भाग – १, प्रकाशक समग्र साहित्य वाङमय लेखन विभाग महाराष्ट्र शासन मुंबई.
4. डॉ. धनराज दहाट, (संपा.) ‘ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे आणि विचार ‘ संकेत प्रकाशन, नागपूर- २००३
5. वसंत मुन ( संपा. ) ‘ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक ‘, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई १९९०.
6. डॉ. पानतावणे गंगाधर, ‘ पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर’, प्रतिभा प्रकाशन, पुणे १९९६.
7. भारतीय संविधान , महाराष्ट्र शासन मुंबई-२००७.
8. दैनिक प्रभात, दि. 1४ एप्रिल २०१८.